महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२-ब / ०२६११०
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक : २०.०९.२०१३

# परिपत्रक

**विषय** : उच्च शिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या अतिरीक्त वेतनवाढी - स्पष्टीकरण.

.....

म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील सेवाविनियम क्र.१०३ अंतर्गत कंपनीत कार्यरत असताना उच्च शिक्षण प्राप्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना जादा वेतनवाढ देण्याबाबतची तरतूद करण्यात आली होती. सदरची तरतूद कर्मचारी सेवाविनियमाचे सु.प.क्र.२९ दि.२०.०२.२०१३ अन्वये सुधारित करण्यात आली असून त्यानुसार अशा प्रकरणांमध्ये जादा वेतनवाढ देण्याबाबतची कार्यपद्धती बंद करण्यात आल्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात विविध क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवरून निदर्शनास येते की, सु.प.क्र.२९ दि.२०.०२.२०१३ नुसार जादा वेतनवाढ मंजूर करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांबाबत अजुनही संदिग्धता असून बऱ्याच अधिकारी/कर्मचारी यांचे जादा वेतनवाढीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

३. या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी सु.प.क्र.२९ दि.२०.०२.२०१३ निर्गमित होण्यापुर्वी त्या त्या संवर्गासाठी विहित करण्यात आलेले उच्च शिक्षण/पदव्युत्तर पदवी संपादित केली असेल आणि अशा अधिकारी/कर्मचारी यांनी सदर सुधारपत्र निर्गमित केल्यानंतरही जादा वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव सादर केले असतील असे अधिकारी/कर्मचारी सेवाविनियमातील तरतुदीनुसार जादा वेतनवाढ मिळण्यास पात्र ठरतात. तथापि, सदर सुधारपत्र निर्गमित केलेल्या तारखेनंतर उच्च शिक्षण प्राप्त केलेले अधिकारी/कर्मचारी जादा वेतनवाढ मिळण्यास पात्र नाहीत.

४. सर्व संबंधीतांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे सखोल अवलोकन करून या संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Circular F.N.2-B - Addl.Increment.doc*